महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र मानसिकआरोग्य संस्था
ससुन सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे ०१

फोन नं. ०२० २६१२७३३१ ईमेलः dp.mimhpune@gov.in Website: www.mimhpune.org

जा.क्र.ममाआसं/आस्था/१८४२/२०२१ दिनांक १६/०७/२०२१

महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथील आस्थापनेवर खाली नमूद केलेली पदे विभागीय निवड समितीद्वारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. या जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | भरावयाची एकूण पदे | बिंदू प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | मनोविकृती चिकित्सक वर्ग-१ | १ | आरक्षण लागू नाही |
| २ | अधिव्याख्याता मनोविकृती सामाजिक कार्य | २ | अराखीव - १, विमुक्त जाती - १ |
| ३ | अधिव्याख्याता क्लिनिकल सायकॉलॉजी | २ | अराखीव - १, इतर मागास प्रवर्ग - १ |
| ४ | अधिव्याख्याता जीवसंख्याशास्त्र | १ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक - १ |
| ५ | समोपदेष्टा | २ | अराखीव - १, अनुसुचित जाती - १. |
| ६ | सहाय्यक ग्रंथपाल | १ | आरक्षण लागू नाही |
| ७ | कनिष्ठ लिपिक | १ | अराखीव |
| **एकूण पदे** | | १० | |

१) <u>मनोविकृती चिकित्सक वर्ग-१</u>

पीबी-३ : १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.६६००

**शैक्षणिक अर्हता :** M.D.(Psychiatry) or M.D.(Medicine) with Diploma in Psychologioal Medicine or Diploma in Psychologioal Medicine.

**अनुभव :** M.D. असल्यास किमान ३ वर्ष व Diploma in Psychologioal Medicine असल्यास किमान ५ वर्ष.

२) <u>अधिव्याख्याता मनोविकृती सामाजिक कार्य वर्ग-२</u>

पीबी-२ : रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.५४००

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेमधून समाज कार्य / समाजशास्त्र / उपयोजित समाजशास्त्रातील पदव्युत्तर पदवी.

आ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. फील. मनोविकृती सामाजिक कार्य ही पदवी.

इ) मनोरूग्णालय, बाल मार्गदर्शन क्लिनिक किंवा सामान्य रूग्णालयातील मनोविकृतीशास्त्र विभाग येथे मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता म्हणून ३ वर्षाचा शिकविण्याचा आणि संशोधनाचा अनुभव असावा.

ई) उमेदवाराने संगणक महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले "संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र" धारण करणे आवश्यक.

उ) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

ऊ) ज्या उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ३५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही, परंतु उमेदवार याआगोदरच शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवाराच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ४० वर्षांपर्यंत राहील.

३) <u>अधिव्याख्याता क्लिनिकल सायकॉलॉजी गट-ब</u>

पीबी-२ : ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.५४००

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची मानसशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी.

आ) भारतीय पुनर्वास परिषद मान्य व मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. फिल चिकित्सा मानसशास्त्र ही पदवी.

इ) उमेदवार RCI Act १९९२ नुसार Clinical Psychologist म्हणून नोंदणीकृत असावा.

ई) उमेदवाराने संगणक महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले "संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र" धारण करणे आवश्यक.

उ) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

ऊ) उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ३५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही, परंतु उमेदवार याअगोदरच शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवाराच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

४) <u>अधिव्याख्याता जीवसंख्याशास्त्र वर्ग-२</u>

पीबी-२ : रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.५४००

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

अ) सांखिकी / जीवसंख्याशास्त्र / जीवनमानशास्त्र या विषयातील एम.एस्सी. पदवी.

आ) जीवसंख्याशास्त्र वा तत्सम पदावर ३ वर्षांचा अनुभव.

इ) पी.एच.डी. पदवी आणि संशोधनाचा अनुभव असल्यास प्राधान्य

५) <u>समोपदेष्टा वर्ग-३</u>

पीबी-२ : रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३००

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

अ) सांविधीक विद्यापीठाची मनोविकृतीचिकित्सा या विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केलेली असेल आणि

आ) महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे या संस्थेचा एक वर्षाचा समोपदेष्टा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असेल किंवा "अ" मध्ये नमूद केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर मानसिक आरोग्यामधील समुपदेशनाचा किमान ५ वर्षांचा अनुभव संपादन केलेला असेल.

६) <u>सहाय्यक ग्रंथपाल वर्ग-३</u>

पीबी-१ : रु. ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२८००

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी. लिब.पदवी उत्तीर्ण व अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

७) <u>कनिष्ठ लिपिक वर्ग-३</u>

पीबी-१ : रु. ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००

**शैक्षणिक अर्हता:**

अ) सांविधीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंव शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

आ) मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रती मिनीट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रती मिनीट

इ) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.

ई) उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी कमाल ४३ वर्ष.

उ) अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

<u>अर्ज सादर करण्याची पध्दत :-</u>

१. उमेदवाराने विहित अर्ज कोऱ्या कागदावर टंकलिखित अथवा स्वहस्ताक्षरात लिहावा. अर्जाच्या उजव्या बाजुस उमेदवाराने त्याचा अलिकडील काळातील रंगीत फोटो चिकटवावा. अर्जामध्ये स्वत:चा भ्रमणध्वनी, पुर्ण पत्ता, ईमेल नमुद करावा तसेच अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, वय, अनुभव, जातीचे प्रमाणपत्र आदींच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांनी त्यांचे अर्ज दिनांक २६ /०७ /२०२१, (सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत) संचालक-प्राध्यापक महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था,ससून सर्वोपचार रुग्णालय परिसर, पुणे -१ या कार्यालयात साध्या पोस्टाने/स्पीड पोस्टाने/रजिस्टर पोस्टाने पाठवावेत. या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवार त्यांचे अर्ज सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० या कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून)कार्यालयात समक्षही सादर करु शकतात.

३. दिनांक २९/०७ /२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संचालक-प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था,पुणे यांचे दालनात उपरोक्त पदासाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. त्यासाठी कोणालाही वैयक्तिकरीत्या लेखी/तोंडी कळविले जाणार नाही.

४. उमेदवारांनी स्वखर्चाने दिलेल्या वेळेत व दिनांकास मुलाखतीसाठी सर्व मुळ कागदपत्रांसहीत/प्रमाणपत्रांसहीत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा. नियम/अटी/शर्ती/आरक्षण/पदसंख्या इ. केव्हाही बदल करण्याचे अधिकार संचालक-प्राध्यापक,ममाआसं,पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे याबाबतचे अंतिम अधिकारही संचालक-प्राध्यापक,ममाआसं,पुणे यांना असतील.

संचालक-प्राध्यापक
महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे-१